काल काही नव्हते ते आज पाहतोय्
उठून आई आई एवढे धुके आत्ता आले कुठून?

नुकताच तर पाउस संपला झाडे बहरून
त्यानेच का पाठवली आहे आपली आठवण?

पहाटेच मी जागा झालो खरं तर भिऊन
छपराच्या पत्र्यावरती टप् टप् टप् ऐकून

खिडकीतून बाहेर पाहिले काहीच का दिसेना
माझ्या डोळ्यावर झापड, की काय तेच कळेना

बाहेर येऊन पाहतो तो मीच उभा ढगात
सगळीकडून धुके शिरले माझ्या नाका-तोंडात

गार गार वाटत होते, सारे काही ओले ओले
आई मला सांग ना, एकदम धुके कुठून आले?